
# संपादकीय



## स्त्री जन्मा हि तुझी कहाणी...

'स्त्री ' ही प्रत्येक पुरुषाच्या जीवनात अनेक रूपात प्रकट होते. आई,बहीण,पत्नी या प्रत्येक रूपात तिची भूमिका बदलते ; पण एक भूमिका मात्र कायम राहते ती म्हणजे ' सेवाभाव' होय. प्रत्येक भूमिकेत ती पुरुषाची सेवा करताना दिसते. मुलांना खाऊपिऊ घालून मोठे करण्याची सेवा आईला करावी लागते. पत्नीने घरकाम करून पतीच्या सेवेत तत्पर असलं पाहिजे ही अपेक्षा तिच्याकडून कायम व्यक्त केली जाते. घरामध्ये बहिणीला भावापेक्षा दुय्यम दर्जाची वागणूक दिली जाते. तिने घर कामात मदत केली पाहिजे हे तिच्यावर संस्कार लहानपणापासून लावले जातात. नोकरी करणाऱ्या महिलांना तर घरकाम करत करत नोकरी करण्याची तारेवरची कसरत करावी लागते.

पतीच्या निधनानंतर स्त्रीला सती जाण्यास भाग पाडले जात होतं ; किंवा केशवपण करून पुढील आयुष्य जगावं लागत होतं. यासारख्या क्रूर आणि कुप्रथा या समाजात होत्या.या प्रथांना मूठमाती देऊन आपण पुढे आलो असलो, तरी आज २१ व्या शतकात देखील हुंडा प्रथा, बालविवाह, स्त्रीभ्रूणहत्या, स्त्रियांवर होणारे अन्याय अत्याचार या समस्या अस्तित्वात आहेतच.

विवाहा नंतर बऱ्याच महिलांना पुरुषाच्या लहरीपणावर पुढील आयुष्य घालवावे लागते. नवरा कसा मिळेल हे तिच्या नशिबावर ठरते. मारझोड करणारा, व्यसनाधीन, वैभिचारी, अतिगर्विष्ठ असे कोणतेही अवगुण असणाऱ्या नवऱ्या बरोबर ' आपलं नशीब खोटं ' समजून आयुष्य ढकलावं लागतं. प्रेमळ,नीतिमान, समजून घेणारा आणि समान दर्जा देणारा असे देखील पती काही महिलांना मिळतात ; मग अशा महिलांचे जीवन आणि संसार हा सुखाचा होतो.' पावसाने झोडपले व नवऱ्याने मारले, तर दाद कोणाकडे मागवावी.' यासारख्या म्हणी आज देखील आपल्या समाजात प्रचलित आहेत. एक प्रकारे नवऱ्याने बायकोला मारहाण करणे आपल्या समाजाने अधिकृतच ठरवले आहे. मारझोड करणाऱ्या नवऱ्याबरोबर गप गुमान संसार करणाऱ्या महिलांचे आयुष्य म्हणजे...

स्त्री जन्मा हि तुझी कहाणी

हृदयी अमृत नयनी पाणी... अशीच असते. रात्री बे रात्री अचानक नवऱ्याचे कधी मानसिक संतुलन बिघडेल सांगता येत नाही. बाहेरील संताप काढण्यासाठी हक्काचे ठिकाण म्हणून नवरा बायकोला मारायला सुरुवात करतो. यामध्ये कित्येक महिलांचे बळी गेल्याचे आपण नेहमी वाचत किंवा ऐकत असतो. कित्येक महिलांना कायमचे शारीरिक अपंगत्व येते. सतत अशा मारझोड करणाऱ्या पतीच्या दहशतीखाली राहून काही महिलांचे मानसिक स्वास्थ्य बिघडल्याचे दिसून येते. मारझोड करणाऱ्या पतीच्या वर्चस्वाखाली राहत असताना त्या महिलेला आपल्या आवडी-निवडी, गरजा, विचार या गोष्टीला दुय्यम स्थान द्यावे लागते. झोपडपट्ट्यांमध्ये दारू पिऊन सर्रास महिलांना मारझोड केली जाते ; एवढेच नव्हे तर मध्यमवर्गीय आणि उच्चभ्रू समाजात देखील अशा पद्धतीने मारहाण होत असल्याचे आपल्या निदर्शनास येते.


महिलांवर होणाऱ्या अत्याचाराला प्रतिबंध बसावा, महिलांनी कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडू नये, समाजामध्ये कौटुंबिक हिंसाचार घडू नये म्हणून केंद्र शासनाने कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५ व नियम २००६ संपूर्ण भारतात लागू केला आहे.

कौटूंबिक हिंसाचाराच्या व्याख्येत शारिरीक छळ जसे मारहाण, चावणे, ढकलणे, लैंगिक अत्याचार तसे जबरदस्तीने समागम करणे, अश्लिल फोटो काढणे, बिभत्स कृत्य जबरदस्तीने करावयास लावणे, बदनामी करणे, तोंडी अथवा भावनिक अत्याचार अपमान करणे, चारित्र्याबद्दल किंवा वागणूकीबद्दल संशय घेणे, मुलगा झाला नाही म्हणून अपमान करणे, हुंडा आणला नाही म्हणून अपमान करणे, महिलेला किंवा तिच्या मुलीला शाळेत जाण्यास मज्जाव करणे, नोकरी स्विकारण्यास मज्जाव करणे, घराबाहेर जाण्यास मज्जाव करणे,नेहमीच्या काम ासाठी कोणत्याही व्यक्तिबरोबर भेटण्यास मज्जाव करणे, विवाह करण्यास जबरदस्ती करणे, पसंतीच्या व्यक्तीबरोबर विवाह करण्याचे जबरदस्तीकरणे, आत्मघातकी धमकी देणे, अपशब्द वापरणे, आर्थिक अत्याचार जसे हुंड्याची मागणी करणे, मुलांचे पालनपोषणसाठी पैसे न देणे, मुलांना अन्न,वस्त्र,औषधे इ.न पुरविणे, नोकरी करण्यास मज्जाव करणे, नोकरीला जाण्यासाठी मज्जाव करणे, नोकरी स्विकारण्यासाठी संमती न देणे, पगार अथवा रोजगार वापरण्यास परवानगी न देणे, राहत्या घरातून हाकलून देणे, घर वापरण्यास मज्जाव करणे, घरातील कपडे अथवा वस्तू वापरण्यापासून रोखणे, भाड्याच्या घराचे भाडे न देणे अशा हिंसाचाराच्या आणि छळांच्या गोष्टीचा अंतर्भाव केला आहे.

महाराष्ट्र शासनाने राज्यातील या कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्व जिल्हा माहिला व बाल विकास अधिकारी, प्रांताधिकारी, तहसिलदार, नायब तहसिलदार, गटविकास अधिकारी व विस्तार अधिकारी यांना महिला संरक्षण अधिकारी म्हणून घोषित केलेले आहे. कौटूंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायद्यांतर्गत तक्रार अर्ज प्राप्त झाल्यानंतर तीन दिवसांच्या आत त्यावर पहिली सुनावणी घेण्याची तरतूद आहे.आपल्याला न्याय हक्क मिळावेत यासाठी पिडीत महिला स्वत: अथवा संरक्षण अधिकाऱ्यामार्फत न्यायालयात अर्ज दाखल करु शकतात व न्यायालयाने अशा अर्जाचा निकाल ६० दिवसात देण्याची तरतूद आहे.

या साऱ्या कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण मिळवण्याच्या तरतुदी कायद्यात असल्या तरी याचा अवलंब करणाऱ्या महिला बोटावर मोजण्या इतक्याच असतील. खूप सार्या महिला 'आलिया भोगासी असावे सादर' म्हणत कायद्याच्या अज्ञानामुळे संपूर्ण आयुष्य छळ छावणीत घालवतात. खरंतर आर्थिक स्वयंपूर्ण महिला अशा कौटुंबिक हिंसाचाराला कवटाळून बसत नाहीत. त्या आपला स्वतंत्र मार्ग निवडतात. कोणतीही महिला कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडू नये म्हणून कुमारी अवस्थेत असतानाच त्यांना शालेय शिक्षण संपल्यानंतर व्यावसायिक शिक्षण त्यांच्या पालकांनी दिले पाहिजे. विवाह करण्याची गडबड न पालकांनी त्यांच्या मुलींना स्वाभिमानाने जीवन जगण्यासाठी व्यावसायिक शिक्षण दिले पाहिजे.

## निसर्ग पाडवा



चैत्र शुद्ध प्रतिपदेला
गुढी शोभते घरोघरी
वसंतोत्सव स्वागता
नगरी सजते परोपरी

प्रभूरामाचे रूप जणूं
निसर्गराजा उपकारी
पिवळी पाने त्यागून
हिरवत्व नवे आकारी

कडुनिंबाचेपानांमध्ये
ओवा मीठ हिंग मिरी
साखर चवीला घाला
मिश्रण वाटा परोपरी

चटणीअसे चटकदार
जरुर खा चमचा भरी
आयुर्वेदाचे हे उपचार
कैक व्याधी करे बरी

कडूनिंबी पाने टाकून
स्नान सुखानंदे करी
थंडावा मिळेलं तनूला
शांतता पसरेलं ऊरी

भुकेल्या कुणा गरीबा
खावूघाले श्रीखंडपुरी
साडी चोळी महिलेला
स्वप्ने सारी होती पुरी

अनाथ मुला जवळ घे
गळ्यात गाठी साखरी
वृक्ष सांगे सावली बना
आस-या येता पाखरी

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

# गुढीपाडवा ! !

## गुढीपाडवा साजरा करण्यामागे आहेत 'या' अनेक कथा

भारतीय संस्कृतीत 'चैत्र शुद्ध प्रतिपदा' हा दिवस 'महापर्व' म्हणून साजरा करण्याची परंपरा आहे. महापर्वाच्या अर्थात नववर्षाच्या या पहिल्या दिवशी नवे संकल्प करून प्रगतीकडे वाटचाल सुरू करण्याचा हा दिवस आपण 'गुढीपाडवा' म्हणून साजरा करतो. या दिवशी विजयाचे प्रतिक म्हणून घराच्या अंगणात गुढी उभारली जाते.

ही गुढी का उभारली जाते? गुढीपाडवा चैत्र शुद्ध प्रतिपदेलाच का साजरा करतात? गुढी उभारण्यापूर्वी ब्रम्हदेवाची पूजा का केली जाते व गुढी उभारून झाल्यावर विष्णू देवाची पूजा करतात? सर्वकाही दडलंय या कथांमध्ये, तेव्हा या पौराणिक कथा सर्वांना माहित असायलाच हव्यात.



**शालिवाहन शकास सुरुवात...**

शालिवाहन ह्या राजाने शालिवाहन शकास सुरुवात केली आणि या शकाची सुरुवात अर्थात आरंभ म्हणजेच गुढीपाडवा होय. शक सुरु करणारा पहिला महाराष्ट्रीयन राजा म्हणून आजही शालिवाहन राजाचे महत्त्व आहे. शालिवाहनाने मातीचे सैन्य तयार केले, त्यावर पाणी शिंपडून मातीच्या सैन्यात प्राण भरला. मग या सैन्यांच्या मदतीने त्याने प्रभावी शत्रूंचा पराभव केला, अशी आख्यायिका आहे. या विजयाप्रित्यर्थ शालिवाहन शके सुरु होऊन नवीन वर्षाची सुरुवात होते. या दिवशी पंचाग वाचन करून आणि देवी सरस्वतीचे पूजन करून हिंदू नववर्षाचे स्वागत करण्याची प्रथा आहे.

**हे एक कारण महाभारतामध्ये सापडते...**

गुढीपाडवा साजरा करण्याचे एक कारण महाभारतामध्ये सुद्धा सापडते. यानुसार महाभारतातील आदिपर्वामध्ये उपरीचर नामक राजाने इंद्रामार्फत त्याला मिळालेली कळकाची काठी इंद्राला नमन म्हणून जमिनीमध्ये रोवली आणि दुसऱ्या दिवशी त्या काठीची पूजा केली. हा दिवस होता नवीन वर्षाचा पहिला दिवस, म्हणून गुढीपाडवा साजरा करतात अशी आख्यायिका सुद्धा आहे.

**ब्रम्हदेवाने केली विश्वनिर्मिती...**

ब्रह्मदेवाने सृष्टी निर्माण केली तो हाच पवित्र दिवस. ब्रम्हदेवाने विश्वनिर्मिती केली ती पाडव्याच्या दिवशीच आणि पुढे सत्य-युगाची सुरुवात झाली आणि म्हणुनच नुतन वर्षारंभ म्हणुन चैत्र शुक्ल प्रतिपदा म्हणजेच गुढीपाडवा साजरा केला जातो असे म्हणतात. या दिवशी विश्वातिल तेज तत्व आणि प्रजापती लहरी या मोठ्या प्रमाणात उत्सर्जीत होतात आणि गुढीच्या माध्यमाने आपण त्या अधिकाधीक संचित करायचा प्रयत्न करतो.



**मत्स्यरूपी विष्णूंचा जन्म...**

भगवान विष्णूंनी मत्स्य रूप धारण करून शंकासुराचा वध केला, त्या मत्स्यरूपी विष्णूंचा जन्म चैत्र-शुद्ध प्रतिपदेचाच. शंखासुर नावाचा सागरापासून उत्पन्न झालेला आणि सदैव सागरातच वास्तव्य करणारा बलाढ्य राक्षस होता. या राक्षसाने जबरदस्तीने वेदहरण केले व तो सागराच्या तळाशी दडी मारून बसला. मग देवदेवता, ऋषीमुनींनी क्षीरसागरामध्ये योगनिद्रेत असलेल्या भगवान विष्णूंना जागृत केले आणि शंखासुरास धडा शिकवण्याकरिता सांगितले. भगवान विष्णूंनी मत्स्यरूप धारण करून शंखासुराचा ठावठिकाणा शोधून काढला व त्याचा शिरच्छेद करणार इतक्यात शंखासुर म्हणाला की, भगवान आपल्या हातून मज मरण यावे याकरिताच मी वेद पळविले. आपण माझा वध अवश्य करावा; परंतु माझी एक इच्छा अशी की माझे कलेवर तुम्ही नेहमी आपल्या डाव्या हातात धारण करावे तसेच माझ्या कलेवराच्या स्पर्शाच्या जलाने आपणांस स्नान केल्याखेरीज आपली पूजा पूर्ण होणार नाही असा मला वर द्यावा.'' भगवान विष्णूंनी 'तथास्तु' म्हटले आणि शंका सुराचा वध केला. त्या दिवसापासून विष्णूने हातात शंखास धारण केले.



**गुढी विजयध्वजाचे प्रतिक...**

गुढी म्हणजे फक्त ब्रम्हध्वजच नाहि तर तो विजयध्वज देखिल आहे. जेव्हा श्री राम लंकेवर विजय मिळवुन अयोध्येला परतले तेव्हा प्रजेने त्यांचे स्वागत ध्वज उभारुन मोठ्या आनंदाने केले. चैत्र शुध्द प्रतिपदेच्याच दिवशी प्रभू रामांचा चौदा वर्षांचा वनवास संपला होता, म्हणून हा आनंदोत्सवाचा दिवस साजरा करतात असे सांगितले जाते.तसेच, असे ही सांगितले जाते की, चैत्र शुद्ध प्रतिपदेला प्रभू रामाने वालीचा वध करून त्याच्या छळातून प्रजेला मुक्त केले; तो हा विजयोत्सवाचा दिवस. घरातून वालीचा, आसुरी शक्तींचा रामाने दैवी शक्तीने नाश केला याचे गुढी ही सूचक आहे.

# ।। गुढी उभारा-मांगल्याची-नववर्षाची ।।

**हिंदू दिनदर्शिके प्रमाणे चैत्र शुध्द प्रतिपदेला गुढी पाडवासण आपण साजरा करतो.गुढीपाडव्या पासूनच हिंदू नववर्षाची सुरुवात होते. आपण साडेतीन मुहूर्त मानतो,त्यातील गुढीपाडवा हे एक मुहूर्त आहे. या दिवशी शुभकार्यासाठी मुहूर्त पहावा लागत नाही. या दिवसातील कोणताही घटिका शुभमुहूर्त असते.**

यदा गुढीपाडवा ९ एप्रिल २०२४ (मंगळवार) रोजी साजरा करण्यात येणार आहे. चैत्र महिन्याची प्रतिपदा ८ एप्रिलला (सोमवारी) रात्री ११ वाजून ५० मिनिटांनी सुरू होणार असून दुसऱ्या दिवशी ९ एप्रिलला रात्री ८ वाजून ३० मिनिटांनी समाप्त होणार आहे. मंगळवारी ९ तारखेला सकाळी ६ वाजून २० मिनिटांनी ते ७ वाजून २९ मिनिटांपर्यंत पुजेची शुभ वेळ आहे. यामध्ये सकाळी ६ वाजून २० मिनिटे ते ६ वाजून २७ मिनिटे हा सर्वोत्तम कालावधी आहे असे पंचागानुसार सांगितलेले आहे. या शुभ मुहुर्तावर गुढीची पुजा करून तुम्ही गुढी उभारू शकता.

आपल्या दाराशी गुढी उभारणे हे विजयाचे तसेच समृद्धीचे प्रतिक समजले जाते.याच दिवशी अनेक जण नविन व्यवसायाला प्रारंभ करतात. नविन कार,नविन फ्लॅट,घर,अशा नानाविध वस्तूंची खरेदी करतात. जो तो आपापल्या ऐपती प्रमाणे सोने खरेदी करतात. एक ग्रॅम का असेना,पण घेतात.त्या दिवशी सोने खरेदी महत्त्वाची मानली गेली आहे. ते समृद्धीचे समजतात.

गुढीपाडव्याचे दिवशी अनेक जण शुभ संकल्प करतात. ह्या दिवशी केलेले संकल्प फलदायी ठरतात.असा अनेकांना अनुभव आहे.

गुढीपाडवा आपसातील वैरभाव,मतभेद, विसरून शांतता मिळवून देणारा आनंददायी असा सण आहे.गुढीपाडवा साजरा करण्यामागे नैसर्गिक, अध्यात्मिक कारणे आहेत.

नवसंवत्सराचा प्रारंभ होतो.नववर्षाचा हा पहिला दिवस महत्वाचा तसेच पवित्र समजला जातो.ह्याच दिवशी नविन वर्षाचे पंचांग आणून त्याचेही पूजन केले जाते.वाचन करतात.

अनेक शहरात,गावात,पहाटेच भक्तिसंगिताचे पाडवा पहाट सारखे कार्यक्रम आयोजित केले जातात अनेक ठिकाणी पारंपारिक वेशभूषा करून शोभायात्रा काढल्या जातात,आणि नववर्षाचे स्वागत केले जाते. आनंददायी सुरुवात केली जाते.

नविन वर्षाचे स्वागतासाठी दारा समोर गुढी उभारली जाते. गुढी हे विजयाचे प्रतिक आहे. सकाळी मंगल स्नानादी उरकून, नविन वस्त्र परिधान करुन,बांबूच्या काठीला पिवळ्या किंवा भगव्या-केशरी रंगाचे वस्त्र नेसवून,गुंडाळून, तांब्याच्या किंवा चांदीचा कलश उलटा ठेवतात. त्याला गंध लावून कडूनिंबाचे पानाचा घोस लावतात. साखरेचा गाठीचा हार,फुलांचा हार घालतात.हळदीकुंकवाने पूजा केली जाते.निरांजन उदबत्ती ओवाळतात.पेढ्याचा नेवैद्य दाखवतात. आरती करतात..

विश्व निर्मिती ब्रह्म करितो ब्रह्मपुराणी असे,
अयोध्यैसी वनवासाहुनी राम पुन्हा परतसे
गुढ्या तोरणे रांगोळ्यांनी स्वागत ते करती
आरती करूनी वसंत ऋतुचा महिमा वर्णू किती.
साखरमाळा कडुलिंबाची पाने, फुलांच्या माळा किती
गडू चांदीचा रेशमी वस्त्रे कुंकू केशर टिळा
आदराने ब्रह्मध्वज या गुढीस संबोधती
आरती करुनी वसंत ऋतुचा महिमा वर्णू किती..


मंगल वाद्यावर वादन केले जाते. आणि नववर्ष सुखसमृध्दीचे,आनंदाने जावे म्हणून मनोभावे प्रार्थना केली जाते.गुढीची ॐ ब्रम्हध्वजाय नमः म्हणून पूजा करावी.

गुढी दाराशीच उजव्या बाजूला, तशीच खिडकी मध्ये, गच्चीवरही उभारली जाते.दाराशी सडा टाकून सुंदर रांगोळ्या काढतात. घराच्या मुख्य दरवाज्यावर आंब्याची पाने,झेंडुच्या फुलांचे तोरण लावतात. पूजेनंतर कडूनिंबाची पान आणि गुळ मिश्रण सेवन करतात. येणारे वर्ष आरोग्यदायी जाव,उन्हाळा त्रासदायक ठरु नये हीच त्यामागील भावना असते. तसेच ओवा, मीठ, हिंग, मिरी,गुळ, आणि साखर हे कडुलिंबाच्या पानात वाटून खातात. यामुळे पचनक्रिया सुधारणे, पित्ताचा नाश, त्वचा रोग बरे होणे,आदी गोष्टी शक्य होतात. आयुर्वेदात याला खूप महत्त्व आहे.

बहुसंख्य कुटुंबात गुढीपाडव्याला श्रीखंड-पुरीचाच बेत जेवणात असतो.

प्रभू रामचंद्रांनी चौदा वर्ष वनवास भोगून रावण आणि राक्षसांचा पराभव करुन याच दिवशी अयोध्येत प्रवेश केला. त्यांच्या स्वागतासाठी म्हणून घरोघरी तोरणे पताका लावून स्वागत केले.

प्रभु श्रीरारमचंद्राचे विजयाचे प्रतीक, रावणावरच्या विजयाचे कौतुक, असा हा आनंददायी सण.



**विजय पताका श्रीरामाची झळकते अंबरी...**
**प्रभु आले मंदिरी....**
**गुलाल उधळूनी नगर रंगले...**
**भक्त जनांचे थवे नाचले...**
**राम भक्तिचा गंध दरवळे ...**
**गुढ्या तोरणे,घरोघरी..**
**गं.घरोघरी.।**
**प्रभु आले मंदिरी,...**
**अयोध्येचा आला राजा...**

या गाण्यात त्याच खूप छान वर्णन केल आहे.

रावणाच्या त्रासातून मुक्त झाल्यानी,व श्रीरामाचे आगमन झाल्याने नगरवासीय आनंदित झाले आहे.. त्यांनी गुढ्या उभारल्या, तोरणांनी घरे सजविले, गुढीपाडव्याचे दिवशी घरोघरी हे गाणं ऐकायला मिळत.

पार्वतीचा आणि महादेवाचा विवाह पाडव्याच्या दिवशी ठरल्या असल्याचे देखील कथा आहे.

भगवान विष्णूंनी या दिवशी मत्स्य अवतार घेतला. या दिवसापासून शालीवाहन शक सुरु झाले. या दिवशी शालिवाहनाने शत्रूवर विजय मिळवला।

संध्याकाळी परत गुढीची पूजा करुन गुढी उतरवण्याची प्रथा आहे.

गेल्या अनेक वर्षापासूनचा आपल्यावर पाश्चात्यांचा पगडा कायम आहे.एक जानेवारीलाच नववर्ष साजरा करण्याचा पायंडा पडला आहे.३१ डिसेंबरला मद्यधुंदावस्थेत सरत्या वर्षाला निरोप द्यायचा, आणि त्याच अवस्थेत नववर्षाच्या स्वागत करायच.रात्रीच्या अंधारात नववर्षाचे स्वागत होत नाही. सुर्याच्या पहिल्या किरणांचे स्वागत करुन नवीन वर्ष साजरे केले जावे.

रात्री फटाके फोडायचे, धूंदीत स्वागत करायचे.काय विचित्र आणि हिडीस प्रकार सुरु असतात.मग अनेक प्रकार घडतात.अपघात, मारामाऱ्या, बलात्कार, विनयभंग, संस्कृतीच अधःपतन सुरु आहे.कोण थोपवणार हे सगळं? ज्यांनी काहीतरी करायला हव,ते बसतात मुग गिळून गुपचुप. सरकारी तिजोरीत मात्र खूपसारा पैसा जमा होतो.निरनिराळ्या वृत्तपत्रांतून दारुविक्रीचा उच्चांक जाहीर होतो.विक्रमी विक्री होते.

२८ डिसेंबर ते ४-५ जानेवारी पर्यंत शासनाने दारूबंदी करावी,बघा कोण नववर्ष हे साजर करतो?( नव्वद टक्के लोकांच हे नववर्ष केवळ आणि केवळ मद्य प्राशनासाठी आणि पार्ट्या साठीच साजर करणं असते हे सांगायला नकोच.) काय साध्य होतय यातून?.

सत्ययुगाचा आरंभ म्हणजे गुढीपाडवा, ब्रह्मदेवाने सृष्टी निर्माण केली तो दिवस म्हणजे गुढीपाडवा.प्रभूश्रीरामाचे आगमनाचा दिवस. आता गुढीपाडवा हाच नववर्षाचा दिवस आहे आणि पाश्चात्यांनी आपल्यावर लादलेला नववर्ष दिवस हा मोडीत काढायला हवा आहे. त्यादृष्टीने सर्वसमावेशक प्रयत्न करायला हवे.गुढीपाडवा.. आध्यात्मिक दृष्टीने अतिशय महत्वाचा दिवस आहे.आणि ते योग्यच आहे.

पाश्चात्त्यांच करत असलेले अंधानुकरण रोखण्यासाठी आपण सर्वांनीच पुढाकार घ्यायला हवा.गुढीपाडव्याला मांगल्याची गुढी उभारून, नववर्षाचे स्वागत करुन,एकमेकांना नववर्षाच्या मंगलमय शुभेच्छा देऊन आपला मराठी बाणा जपू या!

गुढीपाडव्याच्या दिवशी गावोगावी शोभयात्रा काढतात.काढायला हव्यात. सगळ्यांनी गुढीपाडव्याचा सण साजरा करायचा आहे.आनंद मिळवायचा आहे.


**सर्वांना गुढीपाडवा व**
**हिंदूनववर्षाच्या शुभेच्छा.!**



**- दिलीप देशपांडे**
**जामनेर. जि.जळगांव**
**मोबा.८९९९५६६९१७**

This letter was written by owner, printer, publisher - Vinod Kailas Gore by Siddhakala Print Media And Publications Pvt. Ltd. at Main Road, At. Plot No. W-230, T.T.C. Industrial Area, Khairne MIDC, Thane Belapur Road, Navi Mumbai, Dist- Thane, Pin Code- 400710, Maharashtra and Published at C/o. Prashant Arun Chavan, House No. 926/3, Flat No. 301, Sector 1A, Nerul, Navi Mumbai, Thane Maharashtra – 400 706 Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Thane Court.
Email : newsaksharaj2021@gmail.com Editor : Prashant Arun Chavan (Editorial responsibility will remain with PRB as per law.) Mob : 8605313202
हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक विनोद कैलास गोरे - यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रा.लि.,प्लॉट नं. डब्लू- २३०, टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरीया, खैरणे एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई, जि. ठाणे, पिन कोड - ४०० ७१०, महाराष्ट्र येथे मुद्रित करून, प्रशांत अरुण चव्हाण, हाऊस नं.९२६/३, फ्लॅट ३०१, सेक्टर १अ, नेरुळ, नवी मुंबई, जि.ठाणे, महाराष्ट्र - ४०० ७०६ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे. या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद ठाणे न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : प्रशांत अरुण चव्हाण (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्याकडे राहील.) मोबा.: ८६०५३१३२०२


आपणांस व आपल्या परिवारास
मराठी नववर्षाच्या व
गुढीपाडव्याच्या
हार्दिक शुभेच्छा..!
गुढीपाडवा
राजकुमार इकडे
(पत्रकार)
मनोहर साबळे
(उद्योजक)
राजुशेठ पवार
(उद्योजक)
महेश देशमुख
(सरपंच)
बंटीशेठ साबळे
(मा.सरपंच)
अनिल जवक
(चेअरमन)
राहुल शिंदे (पाटील)
( पारनेर ता. अध्यक्ष भाजपा)
: शुभेच्छुक :
रांजणगाव मशीद सुपा व पारनेर तालुका
पंचक्रोशीतील समस्त नागरिक


तुम्हाला व तुमच्या परिवाराला
हिंदू नववर्षाच्या व
गुढीपाडव्याच्या
हार्दिक शुभेच्छा..!
गुढी पाडवा
श्री.प्रभाकर एस.शेट्टी
समाजसेवक
डोंबिवली


Alphonso Mango
अस्सल देवगड हापूस
Experience sweetness now at
a budget-friendly price
डायरेक्ट शेतातून आपल्या घरी *
फळ 200-250ग्राम वजनाचे
1 - 3. Dozen
1300/DOZEN
5- 5.5 Dozen
Rs. 1200 /DOZEN
ORDER NOW: 9960425135


आपणांस व आपल्या परिवारास
मराठी नववर्षाच्या व
गुढीपाडव्याच्या
हार्दिक शुभेच्छा..!
अन्याय निवारण निर्मुलन सेवा समिती
गुढी पाडवा
श्री.अरुण रोडे
जिल्हा अध्यक्ष
मो.९८५०८८८२८१
राजुशेठ पवार
नगर जिल्हाध्यक्ष
कार्यालय : धोत्रे बु. ता. पारनेर, जि. अहमदनगर


ग्रामदैवत बनाईदेवी यात्रेनिमित्त टाकळीढोकेश्वर मध्ये
सर्वांचे हार्दिक स्वागत...
मराठी नववर्षाच्या व गुढीपाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा..!
हॉटेल वैष्णवी
फॅमिली रेस्टॉरंट
* स्पेशल मटन, चिकन व
मच्छी मिळण्याचे एकमेव ठिकाण
* पार्टीसाठी विशेष सुविधा
* फॅमिलीसाठी स्वतंत्र बैठक व्यवस्था
* पार्सल सुविधा उपलब्ध
प्रो.प्रा.संतोष ढाणगे
मो.७७९८४८२८१८/८८३०५७८५०५
नगर-कल्याण हायवे, पारनेर चौक, टाकळी ढोकेश्वर
ता.पारनेर, जि.अ.नगर


तुम्हाला व तुमच्या परिवाराला
मराठी नववर्षाच्या व गुढीपाडव्याच्या
हार्दिक शुभेच्छा..!
गुढी पाडवा
श्री.मोहनराव रोकडे
महाराष्ट्र राज्य सरपंच परिषदेचे
अहिल्यानगर जिल्हा
समन्वयक


भावपूर्ण आदरांजली
जन्म झाला म्हणजे मृत्यु अटळ...
पण काही व्यक्ती आपल्या कर्तृत्वाने नेहमीच-
सर्वांच्या लक्षात राहतात असेच आमचे...
कै. विनायक नारायण गायकवाड सर
आमच्या संस्थेचे माजी अध्यक्ष
कै. विनायक नारायण गायकवाड सर
यांस विनम्र अभिवादन!
तायक्वांडो असोसिएशन ऑफ सबर्बन मुंबई
वॉरिअर तायक्वांडो अकादमी, घाटकोपर


तुम्हाला व तुमच्या परिवाराला मराठी नववर्षाच्या
व गुढीपाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा..!
गुढीपाडवा
MR. JAGDISH ANCHAN
Gen. SECRETARY
MUMBAI SUBURBAN TUG OF WAR ASSOCIATION,
DODGEBALL ASSOCIATION, NETBALL ASSOCIATION,
ATYA PATYA ASSOCIATION,
SHOOTING BALL ASSOCIATION,
FLOORBALL ASSOCIATION


आपणांस व आपल्या परिवारास
मराठी नववर्षाच्या व
गुढीपाडव्याच्या
हार्दिक शुभेच्छा..!
गुढीपाडवा
सय्याराम नरावाड
(माजी चेअरमन वि.का.से.स.सोसायटी.)
नरेश सब्बनवार
(संचालक वि.का.से.स.सोसायटी.)
भीम पोतनकर
(सामाजिक कार्यकर्ते)
डॉ.नरेश बोधनकर
(श्री साई क्लिनीक, कुंडलवाडी)
दत्ता हमंद
(दै.अक्षराज पत्रकार)
करण समेटवार
(संगीत विशारद)

# छत्रपती संभाजी महाराजांच्या हत्येचा गुढीपाडव्याशी संबंध आहे का ?



हिंदवी स्वराज्याचे धाकले धनी छत्रपती संभाजी महाराज यांची हत्या क्रूरकर्मा औरंगजेबाने अत्यंत हाल हाल करून फाल्गुन अमावास्येच्या रात्री केली याविषयीचे सविस्तर दाखले इतिहासकारांनी त्यावेळीच मांडले आहेत. मागील महिन्यात प्रदर्शित झालेल्या छावा चित्रपटाने हा सत्य इतिहास जगासमोर मांडला. असे असताना काही जात्यंध शक्ती समाजात दुही माजवण्याच्या उद्देशाने गुढीपाडवा जवळ आला की संभाजी महाराजांची हत्या ब्राह्मणांनी मनुस्मृतीनुसार केल्याचा विखारी प्रचार करताना आढळतात.

सामाजिक माध्यमांतून तशा पोस्ट पसरवल्या जातात. ब्राह्मणद्वेषाची कावीळ झालेले हे महाभाग वर्षभर संभाजी महाराजांचे नावही घेत नाहीत; मात्र गुढीपाडवा जवळ आला की हा सण संभाजी महाराजांच्या हत्येप्रीत्यर्थ ब्राह्मणांनी साजरा करण्यास सुरुवात केल्याचे ढोल बडवून सांगू लागतात. रावणाचा वध करून प्रभू श्रीराम वनवासातून परतल्याच्या आनंद महाराष्ट्र प्रदेशात गुढ्या उभारून साजरा केल्याचा इतिहास आहे. आनंद साजरा करण्यासाठी महाराष्ट्रात पूर्वीपासून गुढ्या उभारत असल्याचा उल्लेख शिवकालीन इतिहासातच नव्हे, तर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्वकाळातील उपलब्ध पत्रव्यवहारांतूनही, संतांच्या अभंगांतून, इतिहासकालीन दाखल्यातून आढळतो. इतिहासाचार्य वि.के.राजवाडे यांनी 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने', या नावाने इतिहासाचे अनेक खंड प्रसिद्ध केले आहेत ज्यामध्ये इतिहासकालीन विविध पत्र आणि दस्तावेज संग्रहित आहेत. त्यातील एका पत्रात 'गुढी पाडवा' या सणाचा उल्लेख केलेला आपल्याला आढळतो. या पात्रात असा उल्लेख आहे कि 'गुढीपाडवा या सणानिमित्त निराजी पंडित आपल्या घरी आले होते.' हे पत्र नारायण शेणवी या मुंबईच्या वकिलाने मुंबईच्या गव्हर्नरला लिहिले आहे. हे निराजी पंडित म्हणजे शिवरायांच्या अष्टप्रधान मंडळातील एक सदस्य होते आणि ते आपल्या घरी गुढीपाडव्यानिमित्त आल्याचा उल्लेख सापडतो. यावरून हे स्पष्ट होते कि शिवरायांच्या काळातही गुढीपाडवा सण साजरा केला जात असे.

आपल्या संतांनी देखील गुढीपाडव्याचा उल्लेख अनेक ओव्या आणि अभंग यांतून केला आहे. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माउली ज्ञानेश्वरीतील अध्याय क्रमांक ४ ओवी क्रमांक ५२ मध्ये लिहितात 'अधर्माची अवधी तोडी। दोषांची लिहिली फाडी।सज्जनांकरवी गुढी। सुखाची उभवी।।' ज्ञानेश्वरीतील अध्याय क्रमांक ६ ओवी क्रमांक ५२ मध्ये पुढील ओळी आढळतात 'ऐके संन्यासी तोची योगी। ऐसी एकवाक्यतेची जगी। गुढी उभविली अनेगी। शास्त्रांतरी।।' तर अध्याय क्रमांक १४ ओवी क्रमांक ४१० मध्ये माऊली म्हणतात **'माझी अवसरी ते फेडी। विजयाची सांगे गुढी। येरू जीवी म्हणे सांडी। गोवी यिया।।'** संत एकनाथ महाराज भागवतात श्रीराम चरित्र वर्णन करताना म्हणतात 'फेडावया देवाची साकडी। स्वधर्म वाढवावया वाढी। नामे मोक्षाची उभवावया गुढी। सूर्यवंशा गाढी दशा आली।।' पुढे श्रीकृष्ण चरित्रात ते म्हणतात, 'गुढीयेसी सांगू आले। कंस चाणुर मर्दिले।। हर्षे नाचताती भोजे। जिंकियेले यादवराजे।। गुढी आली वृंदावना। मथुरा दिली उग्रसेना।।झाला त्रिभुवनी उल्हास। लळीत गाये भानुदास।।' शिवकालीन खंडात होऊन केलेले जगद्गुरू संत तुकाराम महाराज गुढीचे वर्णन करताना म्हणतात 'ब्रह्मानंदे लोक सकळ नाचती।गुढीया उभविती घरोघरी।।' एके ठिकाणी महाराज लिहितात, 'गोकुळीच्या सुखा अंतपार नाही लेखा। बाळकृष्ण नंदाघरी आनंदल्या नरनारी। गुढिया तोरणे करिती कथा गाती गाणे। तुका म्हणे छंदे येणे वेधिली गोविंदे।।' संत चोखामेळा यांचा पुढील अभंग तर सर्वश्रुत आहे, 'टाळी वाजवावी गुढी उभारावी। वाट ही चालावी पंढरीची ।।' यासंदर्भात संशोधनच करायचे म्हटले तर शेकडो पुरावे सापडतील, त्यामुळे छत्रपती संभाजी संभाजी महाराजांच्या हत्येचा संबंध गुढीपाडवा या प्राचीन सणाशी जोडण्याचा जात्यंध शक्तींचा अपप्रचार केवळ सामाजिक तेढ निर्माण करण्यासाठीच असल्याचे स्पष्ट होते. क्रूरकर्मा औरंगजेब हा अत्यंत निष्ठुर आणि धर्मांध होता. छत्रपती संभाजी महाराजांना पकडून एक महिना त्याने महाराजांवर अनन्वित अत्याचार केले. धर्मांतरण करण्यास दबाव आणला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या आणि आई जिजाऊंच्या संस्कारांतून मोठे झालेल्या शंभू राजांनी प्राण त्यागने पसंत केले मात्र हिंदू धर्म त्यागला नाही.

शंभूराजांची धर्मनिष्ठा औरंग्याच्या जिव्हारी खुपली. चैत्र शुद्ध प्रतिपदा हा हिंदूंचा सर्वात मोठा सण. हिंदूचा नववर्षारंभ. हा सण हिंदूंनी साजरा करू नये म्हणूनच फाल्गुन अमावास्येला त्याने छत्रपती संभाजी महाराजांची हत्या केली. त्याने ज्या उद्देशाने हा डाव साधला तोच डाव यशस्वी करण्याचा दुर्दैवी प्रयत्न आजची काही धर्मद्वेषी मंडळी करत आहेत. हल्ली गुढ्यांऐवजी घरांवर भगवे ध्वज उभारण्याचे आवाहन करणारे संदेशही सामाजिक माध्यमांतून पसरवले जाऊ लागले आहेत. भगवे ध्वज ही स्वराज्याची पताका तसेच हिंदू धर्माचे प्रतीक असल्याने घरावर अवश्य लावावेत; मात्र केवळ एक दिवसासाठी नव्हे, तर ते कायमस्वरूमी घरावर लावावेत. गुढीपाडव्याला मात्र हिंदू नववर्षाचे स्वागत शास्त्रोक्तरीत्या दारासमोर गुढी उभारूनच करावे.

**सौं.मोक्षदा घाणेकर**
**काळाचौकी, मुंबई**

# पाणी बचतीची सवय लावूया !

यापूर्वी कधीही न अनुभवलेला उकाडा यंदा राज्यातील नागरिकांना मार्च महिन्यातच सहन करावा लागत आहे. एप्रिल आणि मे महिन्यात उन्हाची तीव्रता आणखी वाढणार असल्याने उष्माघाताची शक्यता वर्तवली जात आहे. अन्य ऋतूंच्या तुलनेत उन्हाळ्यात पाण्याचा वापर अधिक वाढतो. वाढती लोकसंख्या, शहरांत सुरु असलेली विकासकामे यांमुळे उपलब्ध पाणी साठ्यावर प्रचंड ताण येत असतो. त्यामुळे येणाऱ्या काळात शहरांतील नागरिकांना पाणी टंचाईचा सामना करावा लागणार आहे हे निश्चित आहे. उन्हाळा सुरु झाला की राज्यतसेचजिल्हाप्रशासनाकडूनदरवर्षीपाणीवाचवण्याचे आवाहन करण्यात येते. आगामी काळात जगायचे असेल, तर आज पाण्याची बचत करणे अनिवार्य झाले आहे. बऱ्याचदा शेजारी पाजारी अन्य कोणी पाण्याची बचत करताना दिसत नाहीत, मग मीच का पाणी वाचवावे, असे विचार मनात येतात: मात्र शेजारची व्यक्ती पैशाची उधलपट्टी करते म्हणून त्याचे पाहून आपण ती करत नाही, कारण पैशाचे महत्व, पैसे वाचवण्याचे महत्व, पैसे कमावण्यासाठी लागणारी मेहेनत याबाबतची जाण आपल्या प्रत्येकाला आहे.



आज पाणी सहज उपलब्ध होत आहे याचा अर्थ भविष्यातही ते सहज उपलब्ध होईलच असे नाही. त्यामुळे पाण्याच्या बचतीचे महत्वही आपण लक्षात घ्यायला हवे. आपल्या लहान सहान कृतीतून पाण्याची बचत आपल्याला करता येते. पाणी वाचवणे म्हणजे अस्वछ राहणे असे मुळीच नव्हे,आपल्या दैनंदिन स्वच्छतेसाठी उदा. आंघोळ, तोंड धुणे, हात धुणे आणि अन्य स्वच्छतेसाठी किती पाणी आपण व्यय करतो हें प्रत्येकाला ज्ञात असते. त्यामध्येही उन्हाळ्यात जर आपण शॉवरचा वापर करत असू तर बादलीचा वापर करून कित्येक लिटर पाणी आपण वाचवू शकतो, हात धुताना हाताला हॅंडवॉश अथवा साबण लावेपर्यंत आपण नळ चालूच ठेवत असू तर तो बंद करायला हवा. कपडे आणि भांडी धुतांनाही हाच नियम पाळूया. भांड्यांना साबण लावताना नळ बंद ठेवूया. पिण्यासाठी आवश्यक तेव्हढेच पाणी घेऊया, जेणेकरून पाणी पिऊन झाल्यानंतर पेल्यात उरलेले पाणी अन्यत्र टाकावे लागणार नाही. कपडे धुण्यासाठी आणि भांडी घासण्यासाठी शक्य असल्यास काही दिवस यंत्राचा वापर न करता हाताने धुण्याचा प्रयत्न करूया. घरातील एखादा नळ बिघाड झाल्याने त्यातून पाणी गळत असेल, तर तो तत्परतेने दुरुस्त करून घेऊया. झाडांना आवश्यक तेव्हढेच पाणी देऊया. एखाद्या ठिकाणी पाईपलाईनमधून पाण्याची गळती होत असेल तर त्वरित पाणी खात्याला कळवून त्या ठिकाणी दुरुस्ती करून घेऊया. पाणी वाचवण्याचे महत्व आपल्या घरातील लहानग्यांनाही सांगुया. आपण जर सोसायटीत राहत असू तर सोसायटीची मिटिंग घेऊन पाणी वाचवण्याचे प्रयत्न सामूहिकपणे करण्याचा प्रयत्न करूया ! पाण्याला जीवन असे म्हटले जाते. फाईव्ह स्टार हॉटेलमध्ये महागडे जेवण जेवल्यानंतरही ते पचण्यासाठी जेवणांनंतर किमान ग्लासभर पाणी तरी आपल्याला हवेच असते. पाण्याविना जीवनाची आपण कल्पनाही करू शकत नाही. काही देशांमध्ये पाणीटंचाईमुळे इंधनाच्या दरात पाणी विकले जात असल्याच्या बातम्या आजवर आपण वाचल्या आहेत. आज आपण पाणी नाही वाचवले तर भविष्यात भारतातही अशीच परिस्थिती निर्माण होऊ शकते. त्यासाठी पाणी वाचवण्याची सवय आतापासून अंगवळणी पाडूया ! कितीही पाऊस पडला तरी ज्या प्रमाणात लोकसंख्या वाढत आहे आणि ज्या प्रमाणात पाण्याचा व्यय होत आहे ते पाहता उपलब्ध जलसाठे दरवर्षी अपुरेच पडतात. गेल्या काही वर्षांचा अंदाज घेता हवामान खाते आणि पाऊस यांचे गणित कधी जुळताना दिसत नाही त्यामुळे यंदाही पुरेसा पाऊस पडेल याची काहीच शाश्वती नाही. राजकीय मंडळींकडून महाराष्ट्र राज्य समृद्ध पथावर असल्याचे कितीही सांगण्यात येत असले, तरी राज्याच्या काही भागांतील नागरिकांना दरवर्षी भीषण पाणी टंचाईला तोंड द्यावे लागते. ५-६ किलोमीटर अंतर पायपीट करून पाणी आणावे लागते. पाण्याच्या एका थेंबासाठी दरवर्षी कितीतरी पशु पक्ष्यांचा बळी जातो. भगवंताच्या कृपेमुळे आपल्याला पुरेसे पाणी मिळते त्याबद्दल आपण कृतदक्य राहूया आणि आतापासूनच पाणी बचतीची सवय स्वतःला आणि आपल्या कुटुंबाला लावून घेऊया जेणेकरून भविष्यात पाणीबाणी निर्माण झालीच तर तिचा सामना आपल्याला समर्थपणे करता येईल !

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क : ९६६४५५९७८०**

# गुढीपाडव्याचा सण द्विगुणित करणाऱ्या - स्वागत यात्रा

हिंदु नववर्षारंभ हे गुढीपाडव्याच्या दिवसापासून सुरू होते, साडेतीन मुहुर्तांपैकी हा एक शुभ मुहुर्त मानला जातो. हिंदू दिनदर्शिकेप्रमाणे चैत्र शुद्ध प्रतिपदेला महाराष्ट्रात साजरा केला जातो. शालिवाहन संवत्सराचा हा पहिला दिवस आहे. वेदांग ज्योतिष या ग्रंथात सांगितलेल्या साडेतीन मुहूर्तांपैकी हा एक मुहूर्त आहे. या दिवशी नवीन वस्तू खरेदी, व्यवसाय प्रारंभ, नव उपक्रमांचा प्रारंभ, सुवर्ण खरेदी इत्यादी गोष्टी केल्या जातात. दारी उभारलेली गुढी हे विजय आणि समृद्धीचे प्रतीक आहे असे मानले जाते.

होळी, रंगपंचमीचे ऊत्सव पार पडले की तमाम हिंदू बांधव विशेषतः मराठी जनांना वेध लागतात ते,' नव वर्षाच्या' गुढीपाडव्याचे. पुर्वीच्या काळात, बालपणी बच्चे कंपनी च्या तोंडी एकच वाक्य असायचे,' गुढीपाडवा, नीट बोल गाढवा'. गम्मत वाटायची हे म्हणतांना. काळाच्या ओघात आणि नवनवीन तंत्रज्ञानाच्या युगात, बदलत्या जीवनशैलीनुसार, अशा गमती-जमतीला आजची पिढी कदाचित मुकत असेल, कालाऔघात 'कालाय: तस्मै नम:' या उक्तीप्रमाणे कालानुरूप सणवार साजरे करण्याचे स्वरूप बदलले आहे. पण हिंदू समाज गुढीपाडव्याचा सण मोठ्या उत्साहाने साजरा करीत असतो.

गुढीपाडव्याचा सण हा महाराष्ट्रा प्रमाणेच कर्नाटक, आंध्र प्रदेश अशा शेजारच्या राज्यात देखील 'ऊगादी' या नावाने साजरा केला जातो. बाहेरच्या देशातील हिंदू बांधव देखील 'गुढीपाडव्याचा' सण मोठ्या प्रमाणावर साजरा करतात. हिंदु कॅलेंडर नुसार' चैत्र' महिन्याच्या शुक्ल प्रतिपदा या दिवशी 'गुढीपाडवा' साजरा केला जातो. गुढी पाडवा आपल्याला 'शालिवहन' शकाची आठवण करून दोतो. याच शुक्ल प्रतिपदेला संस्कृतमध्ये 'गुढी पाडवा' म्हणुन संबोधले जाते.

त्याचप्रमाणे पुराणातील साडे तीन मुहुर्तांपैकी एक म्हणून याचे महत्त्व आहे. ब्रम्हाने विश्व निर्मिती याच दिवशी केली अशी मान्यता आहे. त्याच प्रमाणे आपल्या सर्वांचे आदर्श असलेले मर्यादा पुरूषोत्तम 'भगवान प्रभू रामचंद्र' याच दिवशी चौदा वर्षांचा वनवास भोगुन, आणि लंकाधिपती रावण आणि त्याच्या राक्षस सेनेचा पराभव करून याच दिवशी अयोध्येत परतले होते, आणि त्यांचे स्वागत अयोध्येतील जनतेने घरांवर गुढी उभारून केले होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या विजयाच्या स्मरणार्थ देखील गुढीपाडवा सण साजरी केला जातो. त्यामुळेच महाराष्ट्रात या दिवशी विजयाचे ध्वज फडकवण्यात येतात.

यातील गुढी ही विजय आणि समृद्धीची प्रतीक मानली जाते.त्याचप्रमाणे 'शालिवाहन' नावाच्या कुंभाराच्या मुलाने शंकाचा पराभव करण्यासाठी सहा हजार मातीच्या सैनिकांचे पूतळे तयार केले, त्यात प्राण निर्माण करून शंकाचा पराभव याच दिवशी केला अशीही एक आख्यायिका आहे. याच शालिवाहन राजाच्या नावाने नवीन कालगणना 'शालिवाहन शक' हे चालू केले गेले. अशा या मंगलमय दिनी गुढी उभारणे हे आनंद, विजय/स्वागताचे प्रतिक ठरते. गुढी ऊंच बांबुला बांधुन तयार केली जाते, बांबूच्या एका टोकाला रेशमी कापड, कडुलिंबाची डहाळ, फुलांचा हार, साखरेची माळ, त्यावर धातुचे भांडे/तांब्या ठेवण्यात येतो. गुढी पाटावर उभारून पुजा-अर्चा केली जाते. याच दिवशी कडुलिंबाच्या पानाचे सेवन आवर्जून केले जाते. कडुनिंबाला त्याच्या औषधी गुणांमुळे 'दिव्यवृक्ष' म्हणुन ओळखले जाते, जवळपास २०० किटाणुंना नष्ट करण्याची ताकद या कडुनिंबात आहे. कडुनिंबाच्या काड्यांचा उपयोग दात घासण्यासाठी मोठ्या प्रमाणावर केला जातो. गुढी उभारतांना सूरवातीला एका पाटावर उभी केली जाते, पाटाकडुन आपण स्थैर्य आपल्या जीवनात अंगिकारू शकतो, त्याचप्रमाणे पाटावर सुपारी ठेवली जाते, त्या सुपारी कडुन आपण संकल्प घेतो. तसेच पाटावर हळदी-कुंकू वाहतो, ते सौभाग्याचे प्रतिक आहे. पाटावर आपण शेवटी मांडतो ते श्रीफळ (नारळ) ठेवले जाते.

उंच काठीच्या टोकाला रेशमी वस्त्र, कडुलिंबाची डहाळ, आंब्याची पाने, फुलांची माळ, साखरेचा हार, ह्या वस्तू बांधायच्या, त्यावर तांब्या, पितळाचा किंवा, कास्याचा गडु उलटा खोचायचा, ही तयार झालेली गुढी, दारात वा बाल्कनीत उभारायची. त्या अगोदर गुढी ज्या जागेवर उभारायची, ती जागा स्वच्छ करून, धुवून पुसुन घ्यायची, त्यावर रांगोळी काढावी. गुढीची काठी तिथे नीट ठेवून बांधावी. गुढीला गंध, अक्षता, फुले वाहुन गुढीची मनोभावे पुजा करायची, निरंजन, उदबत्ती लावावी, दुध साखर, पेढ्यांचा वगैरे गोडधोड नैवेद्य दाखवावा. संध्याकाळी सुर्यास्तापुर्वी गुढी काढून घेतली जाते.

अशा या मंगलमयी 'गुढीपाडव्याची' शान वाढविणाऱ्या ठरता आहेत काही वर्षांपासून निघणाऱ्या सकाळच्या 'शोभायात्रा/स्वागत यात्रा. सुमारे वीस-पंचवीस वर्षांपूर्वी या शोभायात्रा काढण्यास सुरुवात झाली ती सांस्कृतिक, हिंदु बहुल, मराठमोळ्या ओळख असलेल्या डोंबिवली, ठाणे या शहारांमधुन. त्यानंतर मुंबईतील गिरगाव, पूणे, कल्याण, अंबरनाथ, शहापूर अशा अनेक ठिकाणी शोभायात्रा काढण्यास सुरुवात झाली आहे. या स्वागत/शोभायात्रांमध्ये विविध वेषभूषा करून अनेक तरुण तरुणी मोठ्या उत्साहाने भाग घेतात. त्याचप्रमाणे ढोल-ताशा लेझीम पथक, मोटरबाईक रॅली, स्वागत यात्रांची शोभा वाढवितात.



**- अनंत बोरसे**
**शहापूर जिल्हा ठाणे**
**९१५८४९५०३७**

# बनवा उपवासाचे हेल्दी-टेस्टी वरईचे आप्पे

नवरात्रीनिमित्त नऊ दिवस उपवास असल्याने रोज काय बनवयाचे, असा प्रश्न अनेकांना पडतो. त्यात रोज साबुदाणा खिचडी, राजगिऱ्याचा लाडू, रताळे, बटाट्याचे वेफर्स, भगरीची भाकरी, असे तेच तेच पदार्थ खाऊन कंटाळा येतो. त्यामुळे आम्ही तुम्हाला उपवासाचे अप्पे कसे बनवायचे हे सांगणार आहोत. जे तुम्ही नवरात्रीत उपवास असेल, तर नक्की आजमावून पाहा.

**वरईचे आप्पे साहित्य :**

- १ कप वरई
- पाव कप साबुदाणा
- ३ कप दही
- जिरे
- मीठ
- हिरव्या मिरचाच ठेचा

**वरईचे आप्पे कृती :**

- सर्वप्रथम साबुदाणा मिक्सरला दळून घ्यायचा. दळून झाल्यानंतर त्यामध्ये वरई घालून पुन्हा मिक्सरला एकदा फिरवून घ्यावे.
- मग साबुदाणा आणि वरई मिश्रण एका बाउलमध्ये काढून घ्यावे. त्यानंतर त्यामध्ये दही व्यवस्थित मिक्स करून घ्यायचे.
- मग त्यामध्ये एक चमचा जिरे, हिरव्या मिरचीचा ठेचा, चवीनुसार मीठ घालायचे. त्यानंतर मिश्रणात थोडं पाणी घालून ते व्यवस्थित मिक्स करायचं.
- अशा प्रकारे तुम्ही उपवासाच्या आप्प्यांचे पीठ तयार करा. **(टिप – पीठ जास्त पातळं आणि जास्त घट्ट नको)** आप्प्यांचं पीठ तयार झाल्यानंतर ते १५ , २० मिनिटं झाकून बाजूला ठेवून द्यायचे.
- त्यानंतर आप्पे पात्र गरम करून त्यामध्ये तेल सोडा आणि जे बॅटर तयार करून घेतलं आहेत ते आप्पे पात्रात घाला.
- मग झाकणं ठेवून ते २ ते ३ मिनिटे शिजवून घ्यायचे आणि पुन्हा त्यात तेल सोडून दोन्ही बाजूने नीट भाजून घ्यायचे.
- अशा प्रकारे तुमचे उपवासाचे आप्पे तयार सर्वांना सर्व्ह करा.

# टाकळी ढोकेश्वर येथील
## बनाईदेवी यात्रा उत्सवास सोमवारपासून सुरुवात



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२९, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील आदर्श गाव टाकळीढोकेश्वर पंचक्रोशीतील सर्वधर्मियांचे श्रध्दास्थान असलेले जागृत देवस्थान ग्रामदैवत माता बनाई देवी यात्रात्सवाला गुढीपाडव्याच्या दुसऱ्या दिवशी सोमवार दि. ३१ मार्च पासून भक्तीमय वातावरणात सुरुवात होणार आहे. हा चार दिवसीय यात्राउत्सव ३ एप्रिल पर्यंत होणाऱ्या या यात्रोत्सवा निमित्ताने विविध धार्मिक व सांस्कृतिक अशा भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती यात्रा कमिटीचे अध्यक्ष माजी सरपंच शिवाजी खिलारी, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका उपाध्यक्ष अंकुश पायमोडे, यात्रा कमिटीचे उपाध्यक्ष रामभाऊ तराळ यांनी दिली.

सोमवार दि.३१ मार्च २०२५ रोजी फकीर शहावाली बाबांचा संदल कार्यक्रम मोठ्या धुमधडाक्यात दारुगोळ्याची आतषबाजी कण्यात येणार आहे. तसेच परंपरेनुसार मंगळवार दि.१ एप्रिल रोजी सकाळी ८.३० वाजता बनाईदेवी काठी मिरवणूक रात्री ७.३० वाजता भव्य छबिना मिरवणूक व जागरण गोंधळ रात्री १० वाजता निलेश कुमार आहिरेकर सह रुपाली पुणेकर लोकनाट्य तमाशा, बुधवार दि.२ एप्रिल रोजी सकाळी ८.३० वाजता मळगंगा देवीची काठी मिरवणूक, दुपारी चार वाजता कुस्त्यांचा जंगी आखाडा भरविण्यात येणार आहे.

रात्री ७.३० वाजता भव्य छबिना मिरवणूक रात्री १० वाजता मळगंगा मंदिरासमोर जागरण गोंधळ,गुरुवार दि. ३ एप्रिल रोजी सकाळी ८.३० वाजता मुक्ताई देवीची काठी मिरवणूक, यात्रेनिमित्त सकाळी ९ ते ६ वाजेपर्यंत भव्य बैलगाडा शर्यतींचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. रात्री ८.३० वाजता छबिना मिरवणूक, रात्री १० वाजता देवीसमोर जागरण गोंधळ यात्रोत्सवात दररोज भव्य मिरवणुकीसाठी मुख्य पारंपारिक पद्धतीने ढोल ताशा सनई पथक खास आकर्षण असणार आहे. यात्रोत्सव असल्या कारणाने गावातील मुख्य प्रवेशद्वार तसेच संपूर्ण मंदिरांवर विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. यात्रेमध्ये विविध प्रकारची दुकाने थाटणार असल्याने विविध वस्तू खरेदीचा कार्यक्रम तीन दिवस चालतो. टाकळी ढोकेश्वर परिसरातील हा सर्वात मोठा यात्रा उत्सव असतो.

**यात्रा उत्सवाचा आनंद संयमाने घ्या : शिवाजी खिलारी**

टाकळी ढोकेश्वर मध्ये भरणारा फकिर शाहवली बाबांचा संदल आणि बनाईदेवी यात्रा उत्सव हा महाराष्ट्रातील हिंदू मुस्लिम ऐक्याचा अनोखा आविष्कार दाखविणारा यात्रा उत्सव असून अठरा पगाड जातीचे लोक यामध्ये सहभागी होऊन आनंद घेत असतात. मात्र या यात्रा उत्सवाचा आनंद संयमाने घ्या या यात्रा काळात जर कोणीही गैर कृत्य केले तर त्याच्यावर कडक कारवाई करण्यात येईल.

आपले कुलधर्म कुलाचार आपण आनंदाने करावा मात्र त्याला गालबोट लागू नये असे आवाहन यात्रा कमिटीचे अध्यक्ष माजी सरपंच शिवाजी खिलारी, उपाध्यक्ष किरण उर्फ रामभाऊ तराळ, यात्रा कमिटीचे मार्गदर्शक निलेश लंके प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब खिलारी, सचिव पत्रकार वसंत रांधवण, बैलगाडा संघटनेचे अध्यक्ष बाळकृष्ण पायमोडे,धोंडीभाऊ झावरे, संजय झावरे, ग्रा. पं. सदस्य बापूसाहेब रांधवण,राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका उपाध्यक्ष अंकुश पायमोडे, ओबीसी सेलचे उपाध्यक्ष मळिभाऊ रांधवण, शिवानी मॅनेजमेंटचे विक्रम झावरे, प्रकाश ईघे, श्री ढोकेश्वर सैनिक फाउंडेशनचे सचिव संजय खिलारी, माजी उपसरपंच सुनील चव्हाण यांनी केले आहे.

# मांगल्याचे प्रतिक - गुढीपाडवा

चैत्र शुक्ल प्रतिपदा हा दिवस म्हणजे गुढीपाडवा आणि हिंदूंचा नववर्ष दिन म्हणून साजरा केल्या जातो. बदलत्या काळाला अनुसरून आपण सर्वांनी गुढीपाडवा साजरा करताना आध्यात्मिक व धार्मिक विधीसह विज्ञानवादी दृष्टिकोन जोपासायला हवा.प्रेम,एकात्मता व आरोग्याची काळजी कशी घ्यावी याचा संदेश देऊन हिन्दू संस्कृतीची जोपासना करून गुढीपाडवा हा सण साजरा करावयाचा आहे. सर्वप्रथम या दिवशी शरीराला तेल लावून चोळून ते त्वचेत जिरवणे आणि नंतर गरम पाण्याने स्नान करावे म्हणजे अभ्यंग स्नान करावे.अभंग स्नान करताना देश कालखंड कथन करावे. या देश काल कथनातून लक्षात येते आपण किती लहान सूक्ष्म आहोत व या विश्वाच्या अफाट काळावरून कल्पना येते यातून,आपला अहंकार गळून पडतो. स्नानानंतर आंब्याच्या पानांची तोरणे सिद्ध करून प्रवेशद्वारावर लावावे. त्यातून समृद्धीचे प्रतीक असणारे तोरण याचा संदेश देतो कि,भारत देशासह संपूर्ण विश्व सुख,शांती समृद्धीन नांदावं.

प्रथम नित्य कर्म देवपूजा झाल्यानंतर वर्षप्रतीपदेला महाशांती करावी.शांतीचा प्रारंभी ब्रह्मदेवाची पूजा करावी कारण या दिवशी ब्रह्मदेवांनी विश्वाची निर्मिती केली आहे. आपल्या समस्त प्राणीमात्रांसाठी विश्वाची निर्मिती करून त्यांचे आपण उपकृत आहोत याचे स्मरण ठेवावे.त्यांचे पूजन करून त्यांना नमस्कार करावे.या सुंदर सृष्टीचं जतन करून, संवर्धन करणे हे आपले कार्य असून एक मानव या नात्याने वेगवेगळ्या प्रदुर्षनातून तिची हानी होणार नाही याची शपथ घ्यायला हवी.

या दिवसानिमित्त दानाला खूप महत्त्व आहे.चैत्र या महिन्यामध्ये उन्हाळ्याची चाहूल लागलेली असते त्यामुळे या काळात उदकदान (पाणी)अतिशय श्रेष्ठ सांगितले आहे.



त्यासाठी पाणपोई उभारून तहानलेल्यांना पाणी पाजण्याचे सत्कर्म करायला हवे. तीव्र उन्हात तहानलेल्यांची तहान भागवून आत्मा तृप्त केल्यास उच्च कोटीची पुण्य लाभते. त्याचबरोबर संस्कृती जोपासण्याचे माध्यम म्हणजे धर्मग्रंथ. आध्यात्मिक व धार्मिक पुस्तके दान देऊन हा सण साजरा केल्यास, सणसमारंभाचे महत्त्व नव्या पिढीला समजण्यास मदत होईल. या गुढीपाडवाच्या निमित्ताने ज्याप्रमाणे,आपण जानेवारी महिन्याच्या प्रारंभी नववर्षाची शुभेच्छा पत्रे आपल्या नातेवाईकांना व मित्रमंडळींना पाठवत असतो,त्याचप्रमाणे चैत्र शुक्ल प्रतिप्रदेश अर्थात या दिवशी हिंदूं नववर्ष दिन या निमित्ताने एकमेकास शुभेच्छा देऊन नातेवाईक तथा मित्र मंडळींना शुभेच्छापत्र पाठवणे चालू करावे. कारण आज खरा आपला वर्षारंभ आहे व या शुभेच्छा पत्राच्या माध्यमातून गुढीपाडवा या सणाचे महत्त्व टिकून राहील.

मांगल्याचे प्रतीक म्हणून सूर्योदयानंतर लगेचच गुढी उभारावी.मोठ्या वेळूच्या बांबूच्या उंच टोकास पिवळ्या रंगाचे भरदारी कापड बांधून, त्यावर साखरेच्या गाठी, कडूनिंबाची कोवळी पाने, आंब्याच्या डहाळे, लाल फुलांचा हार बांधून वर चांदी तांबे किंवा पितळीचा लोट्याचा कलश लावून,सजवून उडी उभारावी. उभारताना ती मुख्य दरवाजाबाहेर उंबरठ्यालगत भूमीवर उभारावी.गुढी अगदी सरळ उभी न करता पुढील अंगाला थोडीशी झुकलेल्या स्थितीत उभारावी व सुंदर रांगोळी काढून नैवेद्य अर्पण करावा.

गुढीपाडव्या या सणाच्या निमित्ताने कडुलिंबाचा प्रसाद ग्रहण करावा.कोवळी पाने,चण्याची भिजलेली डाळ, मध,जिरे आणि थोडासा हिंग एकत्र करून प्रसाद सिद्ध केल्यास तो सर्वांना वाटावा. हे सर्व पदार्थ आपल्या आरोग्यासाठी अतिशय लाभदायक आहे.त्यातून रोगप्रतिकारशक्ती वाढते व उन्हाळ्यासारख्या उष्ण ऋतूत शरीराची दाहकता अस्वस्थता दूर होते.गुढीपाडव्याच्या दिवशीशेतकरी बांधवानी नांगरणी करावी. नांगराच्या क्रियेने खालची माती वर येते. मातीच्या सूक्ष्म कणांवर प्रजापती लहरींचा संस्कार होऊन बीज अंकुरण्याची भूमिची क्षमता अनेक पटींनी वाढते.त्याचप्रमाणे आगामी लागवडीची पिके उत्तम प्रकारे बहरून येतात व उत्पन्नामध्ये वाढ होते.अशाप्रकारे सूर्यास्ताच्या वेळी गुळाचा नैवेद्य दाखवून नमस्कार करून गुढी उतरवावी.नवचैतन्य अन मांगल्याचे प्रतिक असणारा असा हा हिन्दू नववर्ष म्हणून गुढीपाडवा हा सण धार्मिक विधीसह बदलत्या काळानुसार वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवुन साजरा केल्यास,सण साजरे करण्यामागील हेतू उद्देश व संकल्पना काय आहे याची नवीन पिढीला जाणीव होईल.यामाध्यमातून सण व उत्सव याबद्दलची ओढ निर्माण होईल व संस्कृती टिकून राहण्यास मदत होईल.

गुडीपाडवा व हिन्दू नववर्षारंभा निमित्त हार्दिक शुभेच्छा...!

श्री.विनोद शेनफड जाधव
मासरूळ जि.बुलडाणा
मो.नं.९७६३२८२०७७